आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१६ सप्टेंबर २०२५ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- मागासवर्गीय शासकीय वसतीगृहातल्या विद्यार्थ्यांचा दैनंदिन निर्वाह भत्ता आणि विद्यार्थिनींचा स्वच्छता-प्रसाधन भत्ता दुप्पट होणार

- राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येत्या ३१ जानेवारीपर्यंत घ्याव्या असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

- राज्याचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांचा राजीनामा

**आणि**

- अमलीपदार्थविरोधी दलांच्या राष्ट्रीय परिषदेचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**<><><><>**

महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग, कॉमिक्स आणि एक्सटेंडेड रिॲलिटी धोरण २०२५ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जाहीर करण्यात आलं. यासाठी सन २०५० पर्यंतचं नियोजन असून सुमारे ३ हजार २६८ कोटी रुपयांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. तसंच राज्याच्या पायाभूत सुविधा उपसमितीला मंत्रिमंडळ समितीचा दर्जा देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यापुढे ही उपसमिती, मंत्रिमंडळ समिती म्हणून काम करेल.

मागासवर्गीय शासकीय वसतीगृहातल्या विद्यार्थ्यांचा दैनंदिन निर्वाह भत्ता आणि विद्यार्थिनींच्या स्वच्छता-प्रसाधन भत्त्यात दुपटीनं वाढ करायला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेला पुढच्या दोन वर्षांसाठी मुदतवाढ देण्यात आली. राज्यभरात ११६ बाजार समित्यांमध्ये नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी आणि असलेल्या भवनांच्या दुरुस्तीसाठी एकंदर १३२ कोटी ४८ लाखांचा खर्च येणार आहे. तसंच विविध ठिकाणी ७९ नवीन शेतकरी भवनं उभारण्याचे प्रस्ताव आहेत.

भंडारा ते गडचिरोली यादरम्यान ९४ किलोमीटरचा प्रवेश नियंत्रित द्रुतगती महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून उभारण्यात येणार असून याची आखणी आणि भूसंपादनाला, तसंच अनुषांगिक ९३१ कोटी १५ लाख रुपयांच्या खर्चाला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी महानिर्मिती आणि मे. सतलज जलविद्युत निगम मर्यादित यांची संयुक्त उद्यम कंपनी स्थापन करायलाही मंत्रिमंडळानं आज हिरवा कंदील दाखवला.

आधुनिक संत्रा केंद्र उभारण्याच्या योजनेला २ वर्षं मुदतवाढ द्यायला मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. मुदतवाढीसह योजनेच्या स्वरूपात अनुषांगिक बदल करायलाही मान्यता देण्यात आली. अकोल्यातल्या दी निळकंठ सहकारी सूतगिरणीला खास बाब म्हणून ५◌ः४५◌ः५० या गुणोत्तरानुसार शासन अर्थसहाय्य द्यायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<><><>**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उद्या साजरा होत आहे. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या राजवटीतून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात विलीन झालं. 'ऑपरेशन पोलो' या लष्करी कारवाईद्वारे भारतीय सैन्याने हैदराबाद ताब्यात घेऊन निजामाचा पराभव केला. हैदराबाद प्रांतातला मराठवाडा हा भागही मुक्त होऊन, भाषेच्या आधारे तो महाराष्ट्रात सामील करण्यात आला. मराठवाड्यात सर्वत्र मुक्तिसंग्रामदिन विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा होतो.

छत्रपती संभाजीनगर इथं सिद्धार्थ उद्यानातल्या स्मृतिस्तंभ परिसरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे. विभागात इतर जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजवंदन होणार आहे.

**<><><>**

मराठवाड्याच्या विकासकामांसाठी मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आलेल्या घोषणांकडे राज्य सरकार दुर्लक्ष करत असल्याची टीका, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकारांशी बोलत होते. २०२३ मध्ये मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं मराठवाड्याचं मागासलेपण दूर करण्याच्या हेतूने मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली होती. या

बैठकीत करण्यात आलेल्या घोषणा अद्यापही पूर्ण झाल्या नसल्याचं दानवे यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

सेवा आणि सुशासन या तत्वांचं अनुसरण करीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रसरकारने अनेक लोकोपयोगी योजना राबवल्या आहेत, हवामान बदल आणि पर्यावरण रक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामगिरीचा थोडक्यात आढावा आपण घेणार आहोत….

*जागतिक स्तरावर भारताने नेहमीच पर्यावरण रक्षणाची भूमिका घेतली आहे. गेल्या ११ वर्षांत वनसंवर्धन, हवामानविषयक न्याय्य भूमिका, सौर आणि हरित ऊर्जा या विषयांचा पुरस्कार करत शाश्वत विकासाला भारताने पाठिंबा दिला आहे. पॅरिसमधे झालेल्या कॉप ट्वेंटीवन परिषदेत 2030 पर्यंत स्वच्छ उर्जा वापर ४० टक्के करण्याचं वचन भारताने दिलं आणि ते 2021मधेच पूर्ण केलं. गेल्या वर्षी अमेरिकेत प्रधानमंत्र्यांनी कार्बन उत्सर्जनाविषयी सांगितलं.*

**होल्ड- बाईट प्रधानमंत्री**

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेने नुकत्याच जीएसटी कररचनेत सुधारणा केल्या. यात नवीन आणि नवीकरणीय उर्जा क्षेत्राच्या वाढीसाठी या क्षेत्राशी संबंधित विविध सामग्रीवरच्या करात कपात करण्यात आली आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून …

**होल्ड… व्हॉईस कास्ट…**

*(केंद्र सरकारच्या स्वच्छ उर्जा उत्पादन धोरणाला आणखी मजबूत करण्यासाठी आणि अपारंपरिक उर्जास्रोतांच्या वापराला चालना देण्याच्या उद्देशाने वस्तू आणि सेवा कर परिषदेने जीएसटी दरात कपात केली आहे. यात सौर कुकर, बायोगॅस प्रकल्प, सौर उर्जा निर्मितीसाठीची उपकरणं, सौर विद्युत जनित्र, सौरपंप, पवनचक्की आणि पवनउर्जेवर चालणारी जनित्र, सौर दिवे, जलविद्युत निर्मिती उपकरणं आणि प्रकल्प यांवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्के इतका आणण्यात आला आहे. यामुळे या उपकरणांवरच्या*

*खर्चात कपात होऊन पारंपरिक वीजनिर्मितीवरचा ताण कमी होईल, तसंच वीजदरही घटतील. सौरपंपामुळे शेतीच्या सिंचनावरच्या खर्चातही घट होणार आहे.)*

**<><><><>**

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं २०२५-२६ या वर्षासाठी प्राप्तिकर विवरणपत्र भरण्याची मुदत आज एका दिवसानं वाढवली आहे. त्यामुळे आज मध्यरात्रीपर्यंत प्रप्तिकरविवरण पत्र भरता येतील. यंदाच्या करनिर्धारण वर्षासाठी  आतापर्यंत सात कोटीहून अधिक प्राप्तिकर विवरणपत्र दाखल झाल्याचं कर विभागानं सांगितलं आहे.

**<><><><>**

राज्यातल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं याआधी ठरवून दिलेली कालमर्यादा न पाळल्याबद्दल न्यायालयानं आज राज्य निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले आणि ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व निवडणुका घेण्याचे निर्देश दिले. यापुढे यासाठी आणखी मुदतवाढ दिली जाणार नाही, असंही न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं स्पष्ट केलं. तसंच वॉर्ड पुनर्रचनेची प्रक्रिया या वर्षीच्या ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी, असंही न्यायालयानं सांगितलं. या निवडणुका चार महिन्यांच्या आत घ्यायचे निर्देश न्यायालयानं ६ मे रोजी दिले होते.

**<><><><>**

राज्याचे महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ यांनी व्यक्तिगत कारण देऊन आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. याबाबतचं पत्र त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिलं आहे. ऑगस्ट २०२२ मध्ये डॉ. सराफ यांची महाधिवक्ता पदावर नियुक्ती झाली होती, आता तीन वर्षांच्या कार्यकाळानंतर ३० सप्टेंबर रोजी पदभार सोडतील.

**<><><><>**

अमली पदार्थांविरुद्धचा लढा केंद्र, आणि राज्यसरकारं तसंच शैक्षणिक संस्थांनी एकत्र येऊन काम करणं आवश्यक आहे असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अमली पदार्थविरोधी दलांच्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन आज नवी दिल्लीत त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते.

केंद्रसरकारने सुरु केलेली नशामुक्त भारत  देशातल्या ३७२ जिल्ह्यांमधे राबवण्यात येत असून  सुमारे १० कोटी लोक आणि तीन लाख शैक्षणिक संस्था त्यात भाग घेत आहेत.

**<><><><>**

स्वच्छताही सेवा या अभियानाला उद्यापासून सुरुवात होणार आहे. हे अभियान यंदा स्वच्छतोत्सव म्हणून साजरं होणार असल्याची माहिती केंद्रीय गृहनिर्माण आणि नगरविकास मंत्री मनोहर लाल यांनी नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत दिली. या अभियानादरम्यान देशभर मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहिमा आणि श्रमदान होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. २५ सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीदिनी एक दिवस, एक साथ, एक तास श्रमदान हा देशव्यापी कार्यक्रम राबवणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी अद्याप पावसाचा जोर आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण, सिल्लोड, गंगापूर, सोयगाव, खुलताबाद तालुक्यात झालेल्या जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. जिल्ह्यातल्या दहा मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली. सिल्लोड तालुक्यातल्या घटनांद्रा इथल्या नदी नाल्यांना पूर आला आहे. ढगफुटी सदृश पावसामुळे अनेक गावांचा संपर्क देखील तुटला आहे.

कन्नड तालुक्यात पिशोर इथं काल रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे खडकी नदीला पूर आला आहे. आसपासच्या परिसरातल्या अनेक घरांमध्ये पाणी शिरलं असून, मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी स्थानिक रहिवाशांनी केली आहे.

**//<><><><>//**